पावती

Original/Duplicate

Monday,July 13 ,2015
5:00 PM

नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 14199 दिनांक: 13/07/2015

गावाचे नाव: मखमलाबाद

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: नसन1-6362-2015

दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा

सादर करणाऱ्याचे नाव: जय डेव्हलपर्स तर्फे भागीदार विजय वासुदेव लालवाणी

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 600.00 |
| पृष्ठांची संख्या: 30 | |
| एकूण: | रु. 30600.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ व सीडी अंदाजे 5:12 PM ह्या वेळेस मिळेल.

Sub Registrar Nashik1

बाजार मुल्य: रु.10492000 /-

भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 524600/-

मोबदला: रु.8821000/-

सह दुय्यम निबंधक वर्ग-२
नाशिक-१

1) देयकाचा प्रकार: eSBTR/SimpleReceipt रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH002241708201516R दिनांक: 13/07/2015
बँकेचे नाव व पत्ता: Bank of Maharashtra
2) देयकाचा प्रकार: By Cash रक्कम: रु 600/-

Received Original Document
Date :- 14 JUL 2015

# Data of Bank Receipt for GRN MH002241708201516R

## Bank - BANK OF MAHARASHTRA

| | | | |
|---|---|---|---|
| Bank/Branch | : | | |
| Pmt Txn id | : ESBTR0000039300 | Simple Receipt | |
| Pmt DtTime | : 13/07/2015 13:31:43 | Print DtTime | : |
| ChallanIdNo | : 02300042015071331535 | GRAS GRN | : MH002241708201516R |
| District | : 5101 / NASHIK | Office Name | : IGR311 / NSK1_HQR SUB REGISTRAR NASHIK 1 |

| | |
|---|---|
| StDuty Schm | : 0030046401-75/ Stamp Duty(Bank Portal) |
| StDuty Amt | : Rs 5,24,600.00/- (Rs Five Lakh Twenty Four Thousand Six Hundred Rupees Only ) |
| RgnFee Schm | : 0030063301-70 / Registration Fee |
| RgnFee Amt | : Rs 30,000.00/- (Rs Thirty Thousand Rupees Only ) |

Only for verification-not to be printed and used

| | | | |
|---|---|---|---|
| Article | : B25 | | |
| Prop Mvblty | : Immovable | Consideration | : 85,21,000.00/- |
| Prop Descr | : Makhmalabad Tal.Distt.Nashik , S.No.418/22 | | |
| | : Plot No.22 | | |
| | : 422004 | | |
| Duty Payer | : PAN-AAGFJ4258F Jay Developers a partnership firm | | |
| Other Party | : PAN-BGYPB9492C Satyabhama Popat Bodke | | |

| | |
|---|---|
| Bank Scroll No | : -- |
| Bank Scroll Date | : -- |
| RBI Credit Date | : -- |
| Mobile Number | : 0000000000 |

नासक - १

दस्त क्र. ( ६३६२/२०१५ )

३०

SEAL OF THE JOINT-SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-1 ★

Bank of Maharashtra

Bank/Branch:BOM - 0230004/
Pmt Txn Id :ESBTR0000039300
Pmt DtTime :13-JUL-2015@13:31:43
ChallanIdNo:02300042015071331535
District :5101/NASHIK

SIMPLE RECEIPT
Print DtTime :13-JUL-2015@13:33:24
Govt Receipt No:MH002241708201516R
Office Name :IGR311/NSK1_HQR SUB R

StDuty Schm:0030046401/0030046401-75
StDuty Amt :Rs. 5,24,600/- (Rs. Five,Two Four,Six Zero Zero Only)

RgnFee Schm:0030063301/0030063301-70
RgnFee Amt :Rs. 30,000/- (Rs. Three Zero,Zero Zero Zero Only)

Article :B25/B25 - Agreement to sell/ Transfer
Prop Mvblty:Immovable
Consideration :Rs. 85,21,000/-
Prop Descr :Makhmalabad Tal.Distt.Nashik,S.No.418/22,Plot No.22,Maharashtra,422004

Duty Payer :PAN-AAGFJ4258F,Jay Developers a partnership firm
Other Party:PAN-BGYPB9492C,Satyabhama Popat Bodke

Applicant Name & Signature

--- --- Space for customer/office use - - - Please write below this line --- ---

नसनं - १
दस्त क्र.( ६३६२/२०१५)
३०

SEAL OF THE JOINT-SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK-1

SEAL OF THE JOINT-SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-1 *

दस्त क्र. ६३६२/२०१५
८ / ३०

| | | |
|---|---|---|
| विभाग क्र. | : | 14.5 |
| विकसनकर्ता यांचे हिश्याचे मुल्य | : | 1,04,92,000/- |
| जमिन मालक यांचे हिश्याचे मुल्य | : | 83,20,000/- |
| पैशाच्या स्वरुपातील मोबदला रु. | : | 2,01,000/- |
| स्टॅम्प | : | 5,24,600/- |
| नोंदणी फि रु. | : | 30,000/- |

## विकसन करारनामा

विकसन करारनामा आज दिनांक 13 माहे जुलै सन 2015 रोज सोमवार ते दिवशी नाशिक मुक्कामी....

| | |
|---|---|
| जय डेव्हलपर्स भागीदारी संस्था<br>तर्फे भागीदार<br>श्री.विजय वासुदेव लालवाणी<br>उ.व.29 , धंदा :शेती व व्यापार,<br>PAN- AAGFJ 4258 F<br>रा.संचेती हाईटस, टेलिफोन एक्सचेंज समोर, कॅनडा कॉर्नर, नाशिक-422002. | लिहुन घेणार |

::यासी::

| | |
|---|---|
| 1. श्रीमती सत्यभामा पोपट बोडके<br>उ.व.46, धंदा:गृहिणी,<br>PAN BGYPB 9492 C<br>2. श्री.जगदिश पोपट बोडके<br>उ.व.26, धंदा: नोकरी,<br>PAN BMLPB 1601 C<br>3. श्री.संतोष पोपट बोडके<br>उ.व.22, धंदा: शिक्षण,<br>PAN BQRPB 4464 R<br>नं.1 ते 3 रा.प्लॉट नं.22, सर्व्हे नं.418,स्वामी विवेकानंद नगर,मखमलाबाद,नाशिक<br>4. करुणा पोपट बोडके<br>लग्नानंतरचे नाव<br>सौ.करुणा चंद्रकांत बर्के<br>उ.व.26,धंदा:गृहिणी,<br>रा. मु.पो.शिंगवे,ता.निफाड,जि.नाशिक | लिहून देणार |

दस्त क्र.( ६३६२ /२०१३ ) [2]
५ / ३०

कारणे विकसन करारनामा लिहुन देतात ऐसा जे की,

या दस्तात यापूढे लिहून घेणार यांचा ऊल्लेख 'तुम्ही/तुमचे/तुम्हाला व लिहून घेणार' असा केलेला असून लिहून देणार यांचा ऊल्लेख 'आम्ही/आमचे/आम्हाला व लिहून देणार' या संज्ञेत केलेला आहे. या सर्व संज्ञांमध्ये लिहून देणार व लिहून घेणार यांचे वंशवारस, उत्तराधिकारी, मुखत्यार, बेचनदार, अभिहस्तांकीती (असायनीझ), कार्यपालक (एक्झीक्युटर्स), कायदेशिर प्रतिनीधी या सर्वांचा समावेश आहे. तसेच सदरचा दस्त व त्यामधील संपुर्ण मजकुर हा लिहुन देणार व लिहुन घेणार यांचेवर तसेच सर्व पक्षांचे वालीवारस,वंशवारस, उत्तराधिकारी,मुखत्यार, बेचनदार, अभिहस्तांकीती (असायनीझ), कार्यपालक (एक्झीक्युटर्स), कायदेशिर प्रतिनीधी या सर्वांवर बंधन कारक आहे व राहील.

तसेच कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीचा उल्लेख ''उपरोक्त मिळकत/सदरची मिळकत''असा करण्यात आलेला आहे.

1] मिळकतीचे वर्णन :तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगर पालिका हददीतील मौजे मखमलाबाद या गावचे शिवारातील बिनशेती प्लॉट मिळकत यासी सर्व्हे नं.418/22 यातील प्लॉट नं.22 यासी क्षेत्र 448.00 चौ.मी. यासी चतु:सिमा पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | रोड. |
| पश्चिमेस | : | प्लॉट नं.23. |
| दक्षिणेस | : | प्लॉट नं.21. |
| उत्तरेस | : | रोड. |

येणे प्रमाणे चतु:सिमेतील वर नमूद प्लॉटेड क्षेत्राची मिळकत तदंगभुत वस्तूसह जल,काष्ट, पाषाण, निधी, निक्षेपासह जाणे-येणेचे हवा, उजेड, पाणी, रस्ता वापरण्याच्या हक्कांसह मिळकतीवरील एफएसआय व टिडीआर वापरण्याचे हक्कासह आम्हास मालक या नात्याने प्राप्त असलेल्या संपुर्ण हक्कांसह दरोबस्त प्लॉट मिळकत.

2] कलम 1 यात वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही आमचे मालकीची मिळकत असून मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला आमचे नाव मालक व कब्जेदार सदरी दाखल आहे.

सदरहू स.नं.418 ची मिळकत सन 1982 चे पुर्वीपासून मधुकर त्रंबक शिंदे यांचे मालकीची मिळकत होती. सन 1982 मध्ये मधुकर

दस्त क्र.(६३६२/२०२४)
६ ३०

शिंदे यांनी मिळकतीवर ले-आऊट बनविलेला असून मिळकत बिनशेतीकडे वर्ग केलेली आहे.त्यानुसार प्लॉट मिळकतीचे 7/12 उतारे फेरफार नोंद क्र.7729 अन्वये मंजूर झालेली आहे. अशाप्रकारे प्लॉट नं.22 ही मिळकत अस्तित्वात आलेली आहे.

तदनंतर सन 1983 मध्ये सदरहू प्लॉट मिळकत ही श्री.हेमंत जयवंत साहानी यांनी मधुकर त्रंबक शिंदे यांचेपासून खरेदी घेतलेली असून त्यानुषंगाने मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला श्री.हेमंत जयवंत साहानी यांचे नाव मालक व कब्जेदार सदरी फेरफार नोंद क्र.7908 अन्वये दाखल झालेले आहे. तदनंतर सन 2000 मध्ये सदरहू प्लॉट मिळकत ही श्री.अशोक दामोदर बोडके व श्री.पोपट दामोदर बोडके यांनी श्री.हेमंत जयवंत साहानी यांचेकडून मोबदल्यापोटी खरेदी घेतली. त्यानुषंगाने मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला फेरफार नोंद क्र.15251 मंजूर होऊन श्री.अशोक बोडके व श्री.पोपट बोडके यांचे नाव मालक व कब्जेदार सदरी दाखल झालेले आहे.

तदनंतर सन 2001 मध्ये श्री.पोपट दामोदर बोडके हे मयत झाले. त्यांना वारसदार म्हणून पत्नी सत्यभामा बोडके म्हणजेच आमचेपैकी नं.1 तसेच मुले जगदीश व संतोष म्हणजेच आमचेपैकी नं.2 व 3 तसेच मुलगी करुणा पोपट बोडके म्हणजेच आमचेपैकी नं.4 ही असल्याने सदरहू वारसदारांची नावे मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला फेरफार नोंद क्र.15875 अन्वये दाखल झालेली आहेत.

तदनंतर सदरहू मिळकतीचे मालकांपैकी श्री.अशोक दामोदर बोडके व करुणा पोपट बोडके उर्फ सौ.करुणा चंद्रकांत बरके म्हणजेच आमचेपैकी नं.4 यांनी मिळकतीसंदर्भाने त्यांचे संपुर्ण हक्क व अधिकार आम्ही लिहून देणार नं.1 ते 3 यांचे लाभात सोडून दिलेले असून तसा हक्कसोड पत्राचा दस्त मे.दुय्यम निबंधक सो.नाशिक यांचे कार्यालयात लिहून व नोंदवुन दिलेला आहे. त्या अनुषंगाने मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला फेरफार नोंद क्र.29966 अन्वये श्री.अशोक दामोदर बोडके व करुणा पोपट बोडके उर्फ सौ.करुणा चंद्रकांत बरके यांचे नाव कमी करण्यात आलेले आहे.तरीही प्रस्तुतचे दस्तास कोणतीही तांत्रीक बाधा राहु नये या कारणास्तव लिहुन देणार नं.4 यांनी प्रस्तुतचे दस्तात लिहुन देणार म्हणुन सही केलेली आहे.

तदनंतर सन 2013 मध्ये श्री.अशोक दामोदर बोडके हे मयत झाले व त्यांचे वारसदार मंदाबाई अशोक बोडके , संदिप उर्फ आनंद अशोक बोडके , ज्योती अशोक बोडके उर्फ ज्योती किरण आव्हाड व सुरज अशोक बोडके हे होते. सदरहू वारसदारांनी मिळकतीचे रेकॉर्ड

दस्त क्र.( 6965 /(4)
७ / ३०

ऑफ राईटसला नोंद होणेकामी अर्ज दाखल केला. त्यानुषंगाने मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला फेरफार नोंद क्र.30131 झालेली आहे. प्रत्यक्षात अशोक दामोदर बोडके यांनी मिळकतीसंदर्भाने संपुर्ण हक्क व अधिकार पुर्वीच आमचे लाभात सोडून दिलेले होते. त्या अनुषंगाने वाद उपस्थित होऊन श्रीमती मंदाबाई अशोक बोडके यांनी आमचेविरुध्द व इतर प्रतिवादींविरुध्द नाशिक मे.सिव्हील जज्ज सो.सिनिअर डिव्हीजन यांचे न्यायालयात वाटपाचा दावा दाखल केला. सदरहू दाव्यास स्पे.मु.नं.571/2013 असा देण्यात आलेला आहे. तदनंतर सदरहू दाव्यामध्ये आमचे तसेच मंदाबाई अशोक बोडके व इतर यांचे दरम्यान समजोता झालेला असून त्या अनुषंगाने दाव्यामध्ये सुलेहनामा व पुरसिस दाखल करण्यात आलेली आहे. सदरहू सुलेनामा सदरहू दाव्यामध्ये नि.37 वर दाखल आहे. सदरहू सुलेहनाम्यानुसार कलम 1 यात वर्णन केलेली प्लॉट नं.22 ही मिळकत आमचे हिश्यास व वाटपास आलेली आहे. त्या अनुषंगाने मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला फेरफार नोंद क्र.32050 मंजूर झालेली आहे. अशाप्रकारे सदरहू मिळकत आमचे मालकीहक्कात व कब्जेवहिवाटीत असून मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला आम्ही लिहून देणार नं.1 ते 3 यांची नावे दाखल झालेली आहे.

आम्ही लिहून देणार नं.4 हे लिहून देणार नं.1यांचे वारसदार असून प्रस्तुतचे दस्तास व व्यवहारास आमची मुक्त संमती असल्याने प्रस्तुतचे दस्तात आम्ही लिहून देणार म्हणून कबुली जबाब दिलेला आहे.

अशा प्रकारे उपरोक्त प्लॉट मिळकतींचे आम्ही मालक व कब्जेदार असून उपरोक्त मिळकतीची पाहीजे तशी विल्हेवाट लावण्याचा मला हक्क व अधिकार आहे.

सदरची मिळकत आम्ही विकसीत करण्याचे ठरविले परंतू आम्हास मिळकत विकसीत करण्यास पुरेसे आर्थीक भांडवल नसल्याने आम्हास सदरची मिळकत विकसीत करणे शक्य नाही. त्यामुळे सदरची मिळकत आम्ही तिऱ्हाईत इसमांकडून विकसीत करण्याचे ठरविले. सदरची बाब तुम्हांस समजली व तुमचा मिळकत विकसीत करण्याचा व्यवसाय असल्याने तुम्ही सदरची मिळकत विकसीत करण्याची तयार दर्शविली. त्याप्रमाणे तुमचे व आमचे दरम्यान मिळकत विकसीत करणेकामी चर्चा होऊन अटी व शर्ती प्रमाणे मिळकती विकसीत करण्याचे ठरले. त्यास अनुसरुन प्रस्तुतचा विकसन करारनामा आम्ही तुमचे लाभात लिहून व नोंदवुन देत आहोत.

3] उपरोक्त कलम 1 या मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर बांधकाम करणेकामी तुम्ही तुमचे पदरखर्चाने नाशिक महानगर पालिका नाशिक यांचेकडील प्रचलीत नियमानुसार आवश्यक असलेला हस्तांतरणीय विकास हक्क / टीडीआर खरेदी करावयाचा आहे व सदरहू टी.डी.आर. क्षेत्राचा वापर करुन तुम्ही सदरहू प्लॉट मिळकतीवर रहिवासी-वाणिज्य अगर तुम्हास योग्य वाटेल तसा इमारत नकाशा बनवुन सदरचा नकाशा नाशिक महानगर पालिका नाशिक यांचेकडून मंजूर करुन घ्यावयाचा आहे.त्याकामी सर्व खर्च तुम्हीच करावयाचा आहे.सदरहू इमारत नकाशा मंजूर झालेनंतर त्यानुसार तुम्ही मिळकतीवर बांधकाम पुर्ण करावयाचे आहे. त्यानुसार आम्ही तुम्हांस सदरहू मिळकत विकसीत करणेकामी हस्तांतरीत केलेली असून त्याचा मोबदला म्हणुन तुम्ही आम्हास खालील प्रमाणे मोबदला दयावयाचा आहे.सदरचा मोबदला हा तुमचे व आमचे संमतीने कायम करण्यात आलेला असून तो योग्य व रास्त आहे याची तुम्ही व आम्ही खात्री केलेली आहे.

येणे प्रमाणे सदरहू प्लॉट मिळकतीवर इमारतीचे बांधकाम तुम्ही तुमचे पदरखर्चाने पुर्ण केलेनंतर सदरच्या बांधीव इमारतीतील एकुण रहिवासी बांधीव क्षेत्रापैकी एकुण 373.58 चौ.मी.बिल्टअप क्षेत्र तुम्ही आमचेपैकी नं.1 ते 3 यांना देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

प्रस्तुतचे विकसन करानाम्यानुसार आमचे पैकी नं.1 ते 3 यांना खालील प्रमाणे तुम्ही खालील प्रमाणे सदनिका क्षेत्र मिळकतीचे विकसनाचा मोबदला म्हणून संपुर्ण मालकीहक्काने दयावयाचा आहे.

तुम्ही आमचे पैकी नं.1 श्रीमती सत्यभामा पोपट बोडके यांना खालील प्रमाणे तुम्ही खालील प्रमाणे सदनिका क्षेत्र मिळकतीचे विकसनाचा मोबदला म्हणून संपुर्ण मालकीहक्काने दयावयाचा आहे.

अे. सदरहु कलम-1 यात वर्णन केलेल्या मिळकतीवर तुम्ही इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेनंतर इमारतीचे दुस-या मजल्यावरील एक बेड+1हॉल+1किचन+टॉयलेट+बाथरुम असलेली एक सदनिका दयावयाची आहे या सदनिकेस नियोजीत इमारत नकाशानुसार मजला दुसरा व सदनिका नं.05 असा असुन या सदनिकेचे एकुण बिल्टअप क्षेत्र 54.18 चौ.मी. आहे.

दस्त क्र. ( ६३६२ / २०

JOINT-SUB-REGISTRAR Class-2

बी. सदरहु कलम-1 यात वर्णन केलेल्या मिळकतीवर तुम्ही इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेनंतर इमारतीचे चौथ्या मजल्यावरील एक बेड+1हॉल+1किचन+टॉयलेट+बाथरुम असलेली एक सदनिका दयावयाची आहे या सदनिकेस नियोजीत इमारत नकाशानुसार मजला चौथा व सदनिका नं.13 असा असुन या सदनिकेचे एकुण बिल्टअप क्षेत्र 54.18 चौ.मी. आहे.

तुम्ही आमचे पैकी नं.2 श्री.जगदिश पोपट बोडके यांना खालील प्रमाणे तुम्ही खालील प्रमाणे सदनिका क्षेत्र मिळकतीचे विकसनाचा मोबदला म्हणून संपुर्ण मालकीहक्काने दयावयाचा आहे.

सी. सदरहु कलम-1 यात वर्णन केलेल्या मिळकतीवर तुम्ही इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेनंतर इमारतीचे पहिल्या मजल्यावरील एक बेड+1हॉल+1किचन+टॉयलेट+बाथरुम असलेली एक सदनिका दयावयाची आहे या सदनिकेस नियोजीत इमारत नकाशानुसार मजला पहिला व सदनिका नं.01 असा असुन या सदनिकेचे एकुण बिल्टअप क्षेत्र 54.18 चौ.मी. आहे.

डी. सदरहु कलम-1 यात वर्णन केलेल्या मिळकतीवर तुम्ही इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेनंतर इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दोन बेड+1हॉल+1किचन+टॉयलेट+बाथरुम असलेली एक सदनिका दयावयाची आहे या सदनिकेस नियोजीत इमारत नकाशानुसार मजला पहिला व सदनिका नं.02 असा असुन या सदनिकेचे एकुण बिल्टअप क्षेत्र 79.08 चौ.मी. आहे.

तुम्ही आमचे पैकी नं.3 श्री.संतोष पोपट बोडके यांना खालील प्रमाणे तुम्ही खालील प्रमाणे सदनिका क्षेत्र मिळकतीचे विकसनाचा मोबदला म्हणून संपुर्ण मालकीहक्काने दयावयाचा आहे.

इ. सदरहु कलम-1 यात वर्णन केलेल्या मिळकतीवर तुम्ही इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेनंतर इमारतीचे दुस-या मजल्यावरील दोन बेड+1हॉल+1किचन+टॉयलेट+बाथरुम असलेली एक सदनिका दयावयाची आहे या सदनिकेस नियोजीत इमारत नकाशानुसार मजला दुसरा व सदनिका नं.08 असा असुन या सदनिकेचे एकुण बिल्टअप क्षेत्र 77.78 चौ.मी. आहे.

दस्त क्र.(६३६२/२०१५)

१० ३०

एफ. सदरहु कलम-1 यात वर्णन केलेल्या मिळकतीवर तुम्ही इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेनंतर इमारतीचे तिस-या मजल्यावरील एक बेड+1हॉल+1किचन+टॉयलेट+बाथरुम असलेली एक सदनिका दयावयाची आहे या सदनिकेस नियोजीत इमारत नकाशानुसार मजला तिसरा व सदनिका नं.09 असा असुन या सदनिकेचे एकुण बिल्टअप क्षेत्र 54.18 चौ.मी. आहे.

अशा प्रकारे तुम्ही आमचेपैकी नं.1 ते 3 यांना सदरहु मिळकतीचे विकसनाचे मोबदल्यापोटी 373.58 चौ.मी. रहिवाशी क्षेत्र दयावयाचे असून नं.4 यांना कोणताही मोबदला दयावयाचा नाही.सदरहू मोबदल्याचे क्षेत्र हे तुम्ही आम्हांस आमचे मागणीनुसार व सुचनेनुसार निश्चीत करुन दिलेले आहे व अदा करण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. त्याबाबत आम्ही लिहून देणार यांचे दरम्यान कोणताही वाद अगर तक्रार नाही.

या व्यतिरिक्त तुम्ही आम्हांस पैशाच्या स्वरुपात एकुण रक्कम रु.2,01,000/- (अक्षरी रु.दोन लाख एक हजार मात्र) खालील प्रमाणे रक्कम मोबदला म्हणून अदा केलेली आहे.

| | रक्कम | तपशिल |
|---|---|---|
| 1. | 10,000/- | (अक्षरी रु.दहा हजार मात्र)तुम्ही आमचेपैकी नं.1 यांना दि.18/3/2015 रोजी साक्षीदारा-समक्ष रोख स्वरुपात अदा केलेले आहेत. भरण्याबाबत तक्रार नाही. |
| 2. | 57,000/- | (अक्षरी रु.सत्तावनन हजार मात्र)तुम्ही आमचेपैकी नं.1 यांना महेश को.ऑप.बँक लि.,शाखा नाशिक येथील चेक क्र. 659151 अन्वये दि.25/3/2015 रोजीचे चेक स्वरुपात अदा केलेले आहेत.भरण्याबाबत तक्रार नाही. |
| 3. | 10,000/- | (अक्षरी रु.दहा हजार मात्र)तुम्ही आमचेपैकी नं.2 यांना दि.18/3/2015 रोजी साक्षीदारा-समक्ष रोख स्वरुपात अदा केलेले आहेत. भरण्याबाबत तक्रार नाही. |
| 4. | 57,000/- | (अक्षरी रु.सत्तावनन हजार मात्र)तुम्ही आमचेपैकी नं.2 यांना महेश को.ऑप.बँक लि.,शाखा नाशिक येथील चेक क्र. 659150 अन्वये दि.25/3/2015 रोजीचे चेक स्वरुपात |

अदा केलेले आहेत.भरण्याबाबत तक्रार नाही.

| | | |
|---|---|---|
| 5. | 10,000/- | (अक्षरी रु.दहा हजार मात्र)तुम्ही आमचेपैकी नं.3 यांना दि.18/3/2015 रोजी साक्षीदारा-समक्ष रोख स्वरुपात अदा केलेले आहेत. भरण्याबाबत तक्रार नाही. |
| 6. | 57,000/- | (अक्षरी रु.सत्तावन्न हजार मात्र)तुम्ही आमचेपैकी नं.3 यांना महेश को.ऑप.बँक लि.,शाखा नाशिक येथील चेक क्र65 9057 अन्वये दि.25/3/2015 रोजीचे चेक स्वरुपात अदा केलेले आहेत.भरण्याबाबत तक्रार नाही. |

---

एकुण:2,01,000/- (अक्षरी रु.दोन लाख एक हजार मात्र)

येणे प्रमाणे तुम्ही आम्हांस बांधीव क्षेत्र व पैशाच्या स्वरुपात मोबदला अदा केलेला आहे व करावयाचा आहे.

सदरचा मोबदला हा तुमचे व आमचे दरम्यान स्वसंतोषाने, संमतीने ठरलेला असून सदरच्या विकसनाच्या मोबदल्यात उभयतामध्ये कोणतीही वाद अगर तक्रार नाही. तसेच मिळकतीत वर नमुद मोबदला वगळता उर्वरीत क्षेत्रात आम्ही व आमचे वालीवारस अगर आमचे तर्फे हक्क सांगणारे इसम कोणताही हक्क हितसंबध सांगणार नाहीत किंवा जादा मोबदला मागणार नाहीत.

सदरचा मोबदला हा तुमचे व आमचे दरम्यान स्वसंतोषाने, संमतीने ठरलेला असून सदरच्या विकसनाच्या मोबदल्यात उभयतामध्ये कोणतीही वाद अगर तक्रार नाही.तसेच मिळकतीत वर नमुद मोबदला वगळता उर्वरीत क्षेत्रात आम्ही व आमचे वालीवारस अगर आमचे तर्फे हक्क सांगणारे इसम कोणताही हक्क हितसंबध सांगणार नाहीत किंवा जादा मोबदला मागणार नाहीत.आम्हास मोबदल्यापोटी दयावयाचे वर नमुद क्षेत्राच्या सदनिका व्यतीरीक्त उर्वरीत बांधकाम क्षेत्र तुमचे मालकीचे राहणार असुन ते तुम्हास विक्री करण्याचा संपर्ण हक्क व अधिकार राहणार आहे.

तसेच आम्हाला मोबदल्यापोटी तुम्ही दयावयाचा क्षेत्रामध्ये म्हणजेच वर नमूद केलेल्या सदनिकेमध्ये सदरहू प्रकल्पात तुम्ही इतर सदनिका धारकांना पुरविणा-या जनरल सुविधा दयावयाच्या

आहेत.त्याचे वर्णन परिशिष्ठ-3 मध्ये केलेले आहे.त्या व्यतिरिक्त कोणत्याही जादा सुविधा आम्हास हव्या असल्यास आम्ही तुम्हांस त्या अतिरिक्त जादा सुविधांचा मोबदला बाजारभावाप्रमाणे देण्यास तुम्हांस बांधील राहू.

तसेच मिळकत विकसनासाठी लागणारा सर्व खर्च तुम्ही करावयाचा आहे.त्याचेशी आमचा संबध राहणार नाही.

आम्हाला मिळणाऱ्या मोबदला क्षेत्राचे व्यतिरिक्त म्हणजेच वर नमूद सदनिकें व्यतीरीक्त उर्वरित क्षेत्रावर तुमचाच मालकी हक्क राहणार असून तुम्ही इतर बांधकाम त्रयस्थ इसमास/संस्थेस तुमचे मर्जीने विक्री करावयाचे आहे अथवा तुम्हांस योग्य वाटेल त्याप्रमाणे विल्हेवाट लावावयाची आहे अथवा उपभोग घ्यावयाचा आहे. तुम्ही आम्हांस दिलेल्या मोबदला क्षेत्राचे व्यतिरिक्त उर्वरित क्षेत्र विक्री केल्यास मिळकत विकसीत झालेनंतर सदर विक्री केलेल्या क्षेत्राचा कब्जा तुम्ही खरेदीदारास दयावयाचा आहे. त्याबाबत लागणारे डिक्लेरेशन,प्रतिज्ञापत्र अथवा इतर दस्तऐवज आवश्यकता भासल्यास आम्ही तुम्हांस विना तक्रार विनामोबदला लिहून देऊ.

तसेच आम्हाला मोबदल्यापोटी मिळणा-या क्षेत्रासंदर्भात, आम्ही अथवा आमचे तर्फे हक्क सांगणारे इसम अगर आम्ही विक्री केलेल्या फ्लॅट मिळकतीचे धारक वरील मिळकतीत तयार होणाऱ्या इमारतीतील इतर मिळकत धारकांसोबत सोसायटी अथवा अपार्टमेंट मध्ये सभासद किंवा अपार्टमेंट ओनर म्हणुन राहतील व त्यांचेबरोबर आमचेवर अगर संदर्भीत मिळकत धारकांवरसुध्दा अपार्टमेंट अथवा सोसायटीचे नियम बंधनकारक राहतील.तसेच इतर सभासदांप्रमाणे आम्ही अगर संदर्भीत मिळकतधारक देखील सदर मिळकतीचा मेंटनन्स सोसायटी/अपार्टमेंटचे नियमाप्रमाणे सोसायटी/अपार्टमेंट मध्ये भरु.

तसेच इमारतीचे मेंटनन्सकामी आम्हांस जेवढे क्षेत्र तुम्ही मोबदल्यापोटी अदा करावयाचे आहे या क्षेत्रापोटी ठरविण्यात येइल ती रक्कम आम्ही तुम्हांस मिळकत विकसीत झालेनंतर व आमचे मोबदला क्षेत्र तुम्ही आम्हांस ज्यावेळी कब्जात दयाल त्यावेळेपावेतो आम्ही तुम्हास अदा करु.

तसेच सोसायटी अथवा अपार्टमेंट स्थापनेकामी लागणारा खर्च इतर सभासदांप्रमाणे हिस्सेराशीने देऊ.

तसेच तुम्ही आम्हांस मोबदला क्षेत्रापोटी दयावयाचे वर नमूद तपशिलातील सदनिका मिळकतीमध्ये आवश्यक असलेले विद्युत कनेक्शन व पाणी मिटर संदर्भाने होणारा खर्च व सर्व्हीस टॅक्स,व्हॅट

दस्त क्र.( ६३६३ /१० (10)

व इतर टॅक्स कामी होणारा खर्च देखील आम्हीच करावयाचा आहे. तसेच सदरहू मोबदला क्षेत्र अगर त्या पैकी कोणतेही क्षेत्र आम्ही विक्री केल्यास विक्री केलेले मोबदला क्षेत्राकरीता आवश्यक असणारे विद्युत कनेक्शन व वॉटर मीटर व सर्व्हीस टॅक्स, व्हॅट व इतर टॅक्स कामी होणारा खर्च संबंधाने होणारा खर्च हा त्रयस्थ खरेदीदाराने करावयाचा व सोसावयाचा आहे. तो आम्ही तुम्हास मिळवुन देऊ त्याचेशी तुमचा कोणताही संबंध राहणार नाही. तसेच सदरहु आम्हास मोबदल्यापोटी मिळणा-या सदनिकेचे आमचे नावे दस्तऐवज नोंदविणेकामी होणारा खर्च देखील आम्हीच करावयावया व सोसावयाचा आहे अगर आम्ही आमचे मोबदला क्षेत्र विक्री केल्यास विक्री केलेल्या क्षेत्राचे दस्तऐवज त्रयस्थ इसमांचे लाभात नोंदवितेवेळी देखील होणारा संपुर्ण खर्च हा त्रयस्थ खरेदीदारांनाच करावयाचा व सोसावयाचा आहे. त्याचेशी तुमचा कोणताही संबंध राहणार नाही.

तसेच तुम्ही आम्हाला मिळकतीचे विकसनापोटी दयावयाच्या सदनिकांचा ताबा हा मिळकतीसंदर्भाने इमारत नकाशा मंजूर झाल्याचे दिनांकापासून 24 महिन्याचे आत दयावयाच्या आहेत. मात्र यदाकदाचीत नैसर्गीक आपत्ती अगर इतर कोणत्याही कायदेशीर बदलामुळे अगर तांत्रीक अडचणीमुळे म्हणजेच अशी कोणतीही घटना ज्यावर विकसन कर्ता म्हणजेच तुम्ही लिहून घेणार यांचे नियत्रंण नाही अशी कोणतीही घटना घडल्यास त्यामुळे आम्हांस सदनिकेचा कब्जा तुम्ही देण्यास विलंब झाल्यास त्या कालावधीकरीता मुदत आपोआप वाढविली जाईल. अशाप्रकारे मुदतीत तुम्ही सदरहु सदनिका आमचे कब्जात न दिल्यास दरमहा व प्रतिसदनिका रु.5,000/- मात्र तुम्ही आम्हांस नुकसान भरपाई दयावयाची आहे. तसेच तुम्ही आम्हांस मोबदल्यापोटी दयावयाचे क्षेत्रासंदर्भाने बांधकामाची आम्ही वेळोवेळी खात्री, तपासणी करावयाची आहे. त्याकामी तपासणी करण्याचा हक्क आम्हांस राहणार आहे.

कलम 1 मध्ये वर्णन केलेली मिळकत विकसीत करणेकामी खालील कामे तुम्ही सदरचे मिळकतीमध्ये करावयाची आहेत. (सदरहू कलम 1 यात वर्णन केलेल्या मिळकतीचा संक्षिप्ततेकरीता उल्लेख हा यापुढे सदरची मिळकत, कलम 1 यात वर्णन केलेली मिळकत असा केलेला आहे)

1. तुम्ही सदरचे मिळकतीची प्रथमदर्शनी मोजणी करण्याची आवश्यकता भासल्यास त्याकरीता मा. जिल्हा निरीक्षक भुमी अभिलेख

यांचे कडेस अर्ज करणे, अर्जावर सही करणे, योग्य ती कागदपत्र दाखल करणे, मोजणीचे ठिकाणी प्रत्यक्ष हजर राहणे, नोटीस फॉर्मवर पंच म्हणुन अथवा मालक म्हणुन सही करणे, मोजणी नकाशा स्विकारणे. इ.कामे करणे.तसेच मिळकतीसंदर्भाने बिनशेती आदेश अगर वापरात बदल कामी आदेश मिळविणकामी संपुर्ण कार्यवाही करणे.

2. कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये तुम्ही विकसन कर्ता म्हणुन सदरचे मिळकतीमध्ये बोर्ड लावणे, जाहिरात करणे, वॉचमेन करीता शेड उभारणे, वॉचमेन यांची नेमणुक करणे, त्याचा पगार ठरविणे. तसेच मिळकतीचे सुरक्षिततेसाठी वॉल कंपाऊंड किंवा तार कंपाऊंड बांधणे.इ.कामे करणे.

3. सदरहू मिळकतीवर इमारत नकाशा मंजूर करणेकामी तुमचे मर्जीने अर्किटेक्ट यांची नियुक्ती करणे, अगर नियुक्ती रदद करणे, त्यांचेशी करार-मदार करणे, त्यानुसार तुमचे मर्जीने इमारत नकाशा बनविणे, तो मंजूरीकामी नाशिक महानगर पालिका नाशिक यांचेकडेस दाखल करणे, बेटरमेंट चार्जेस भरणे, नकाशा मंजूरी मिळणेकामी आवश्यक असलेली संपुर्ण कार्यवाही तुम्ही करावयाची आहे. त्याकामी तुम्हांस सर्व हक्क हस्तांतरीत केलेले आहे. सदर नकाशे तुम्हांस आवश्यकता भासल्यास रिव्हाईज करणे, मात्र आम्हांस मोबदल्यापोटी तुम्ही दयावयाचे क्षेत्रामध्ये कोणताही फेरफार होत असल्यास त्यावेळी आमची संमती घेणे आवश्यक राहील. तसेच तुम्हांस फेर नकाशा करावयाचा असल्यास त्यासाठी अर्किटेक्ट नेमणे, तसेच सदर नकाशा हा महानगर पालिकेकडे मंजूरीसाठी सादर करणे, त्याकामी सदर नकाशा मंजूरीसाठी जी जी कागदपत्रे अगर दस्तऐवज, ॲफिडेव्हीट, इंडेम्नीटी बॉंड, अर्ज करुन दयावयाची असतील त्यावर सहया करणे. मात्र नकाशा बनविण्याचा व तो मंजूरीचा संपुर्ण खर्च हा तुम्ही सोसावयाचा आहे. सदरचे प्लॅन मंजूर झालेनंतर ते प्लॅन्स रिव्हाईज करणे, मॉडीफाय करणे, बदलणे, मुदतवाढ घेणे हा हक्क तुम्हांस आहे. इमारत नकाशा मंजूरीसाठी नाशिक महानगर पालिकेकडे डेव्हलपमेंट चार्जेस, बेटरमेंट चार्जेस, बिल्डींग फंडस्, स्कृटीनी फि व इतर चार्जेस भरणे सर्व हक्क व अधिकार तुम्हांस देत आहोत. तसेच इमारत बांधकाम पुर्ण झालेवर इमारतीचे बांधीव भागाचे कंप्लीशन सर्टीफिकेट मिळण्यासाठी तुम्ही नाशिक महानगर पालिकेकडे अर्ज दयावेत, त्यासाठी लागणारी तडजोड फि वगैरे सर्व फि,डिपॉझिटस तुम्ही भरावेत, कंम्प्लीशन संदर्भात वर्तमानपत्रात जाहीर नोटीस, सुचना

दस्त क्र. ( ६३८२ ) १२
९५ / ३०

दयावी, कंम्प्लीशन संदर्भात योग्य ती सर्व कारवाई करुन इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेण्याचे सर्व अधिकार आम्ही तुम्हांस दिलेले आहेत. त्यासाठी आमचे सहया संमत्यांची जरुरी भासल्यास आम्ही विना तक्रार देऊ अथवा आमचे जनरल मुखत्यार व विकसन कर्ता म्हणुन तुम्ही करावयाचे आहे. त्यासाठी अर्किटेक्ट, इंजिनिअर, कॉन्ट्रॅक्टर, सर्व्हेअर यांची नेमणुक तुम्ही करावी. त्यांच्याशी करार करणे, तसेच मिळकतीवर बांधकाम करणे, तसेच मिळकतीवर बांधकामासाठी आवश्यक ते सर्व साहीत्य व अवजारे आणणे. तसेच सदर बांधकामाचा, सदर इसमांचा पगार व फि हा सर्व खर्च सर्वस्वी तुम्ही सोसावयाचा आहे. तसेच बांधकामाच्या ठिकाणी इलेक्ट्रीक आणि वॉटर कनेक्शन्स मिळविण्यासाठी करावी लागणारी कारवाई त्याकामी भरावे लागणारे डिपॉझिटस् वगैरे सर्व कामे तुम्ही करावीत, सदर कनेक्शन डिपॉझीटची रक्कम ज्यावेळी आम्हांस परत मिळेल ती आम्ही तुम्हांस परत करु अथवा ती रक्कम तुम्हांस मिळत असल्यास तुम्ही ती रक्कम घ्यावी. त्यावर आम्ही कोणताही हक्क सांगणार नाही. इमारत बांधकाम पुर्ण करणेकामी करावी लागणारी सर्व कामे तुम्ही करावयाची आहे.

4. सदरची मिळकत विकसीत करुन त्यावर तुम्ही इमारत बांधावयाची आहेत, सदरहु इमारतीमधील बांधीव क्षेत्र (आम्हाला मोबदल्यापोटी दयावयाच्या सदनिका वगळता) विक्री करणेकरीता वर्तमान पत्रात जाहीरात करणे, त्याकरीता त्रयस्थ इसम, कंपनी, संस्था यांचेशी सल्लामसलत करणे, सौदा करणे, सदरचा सौदा कायम करणे त्याकरीता निर्माण होणारे बांधीव क्षेत्रा बाबत करारनामा अथवा तत्सम दस्त तयार करणे व त्यावर सहया करणे इ.कामे करणे. परंतू तुमचे हिश्याचे बांधकाम विक्री केलेल्या रक्कमेवर आयकर भरावा लागल्यास तो तुम्ही भरावा. त्याचेशी आमचा कोणताही संबंध राहणार नाही.

5. सदर मिळकतीवर बांधकाम करण्यांसाठी लाईट कनेक्शन वॉटर कनेक्शन, मिळणेसाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांवर सहया करणे तसेच ॲफीडेव्ही वा इन्डेम्नीटी बॉंड यावर सहया करणे.

6. सदरचे मिळकतीचे बांधकाम करणे कामी कोणत्याही स्वरुपाचे मटेरियल यामध्ये सिमेंट,वाळु, लोखंड, विटा, ॲल्युमिनीयम, गज

नासक - १
(१३)
दस्त क्र.( ६३६० /२०१५)
१६ ३०

इ.संपुर्ण मटेरियल हे लिहुन घेणार यांनी स्वः खर्चाने आणुन बिल्डींग प्लॅनप्रमाणे बांधकाम करावयाचे आहे.

7. सदरच्या मिळकतीवर बांधकाम करणेकामी आवश्यक असलेली शासनाची परवानगी तुम्ही तुमचे खर्चाने मिळविण्याची आहे. यदाकदाचीत इमारतीच्या बांधकाम परवानगीची मुदतवाढ घ्यावी लागल्यांस ती तुम्ही तुमच्या पदरखर्चाने घेण्याची आहे. त्याकामी आमची वेगळी संमती घेण्याची आवश्यकता नाही.

8. सदर मिळकतीचे तयार होणारे बांधकामाचे कंप्लीशन सर्टीफिकेट संबधीत खात्याकडुन घ्यावयाचे झाल्यांस त्याकामी आवश्यक ते सर्व अर्ज संमतीपत्र, इंन्डेम्नीटी बॉंड व इतर कागदपत्रांवर आम्ही आमच्या सहया करुन देऊ.अथवा तुम्ही आमचे जनरल मुखत्यार व विकसन कर्ता म्हणुन सहया करुन सदर सर्टीफिकेट वा परवानगी मिळवावी.त्यास आमची हरकत राहणार नाही.

9. कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकती बाबत नाशिक महानगर पालिका यांचे कडे भरावी लागणारे डेव्हलपमेंट चार्जेस, बेटरमेंट चार्जेस, स्कृटीनी फी, पाणी पटटी, विजेचे बिल, इ.साठी येणारा सर्व खर्च हा तुम्ही करावयाचा आहे.

10. सदर मिळकतीवर तयार होणारे बांधकाम तुम्ही आम्हाला मोबदल्यापोटी दयावयाच्या सदनिका वगळता उर्वरीत बांधीव क्षेत्र त्रयस्थ इसमांस विक्री करणार आहात त्या इसमांस कोणत्याही अर्थिक संस्थेकडुन कर्ज घ्यावे लागल्यांस ते कर्ज घेण्यास आमची संमती राहील व त्याकामी आमचे विकसन कर्ता व जनरल मुखत्यार म्हणुन तुम्ही आवश्यक तेथे सहया करावयाच्या आहेत. परंतू कर्जाची परतफेड करण्याबाबत आमची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

11. सदर मिळकतीवर बांधकाम करण्यांसाठी आम्ही तुम्हांस या विकसन करारनाम्यान्वये मिळकतीचा कब्जा तुम्हांस विकसन कर्ता व सदरची मिळकत विकसीत करणेसाठी दिलेला आहे. तसेच सदरची मिळकतीवर तयार होणारे बांधकाम हे आम्हाला मोबदल्यापोटी दयावयाच्या सदनिका वगळता उर्वरीत बांधकाम खरेदीदारास आमचे तर्फे विकसन कर्ता म्हणुन कब्जा वहिवाटीस दयावयाचा आहे. त्याकामी

दस्त क्र. ( २३६२ / २०२०

(14)

आवश्यकता असल्यास आमचेवतीने कब्जा पावतीवर सही करावी त्यास आमची कोणतीही हरकत राहणार नाही.

12. सदर मिळकतीत तयार होणाऱ्या इमारती अथवा बांधीव भागां पैकी आम्हाला मोबदल्यापोटी दयावयाच्या सदनिका वगळता उर्वरीत क्षेत्राची विक्री करावी लागणार आहे. त्याबाबत दस्तऐवज लिहुन व नोंदवुन द्यावे लागणार आहे ते करारनामा, ॲग्रीमेंट फॉर सेल/ गहाणखत/चुक दुरुस्ती पत्र,मान्यतापत्र./डिड ऑफ अपार्टमेंट इ. अथवा तत्सम दस्त तुम्ही आमचेकरीता व आमचेवतीने लिहुन दयावे, त्यासाठी सहया कराव्यांत तसेच दस्त कबुल करावे व ते दस्तऐवज मे.दुय्यम निबंधक सो. नाशिक यांचे कार्यालयांत अथवा जरुर त्या अधिकाऱ्या समोर आमचेवतीने आमचे विकसन कर्ता म्हणुन लिहुन व नोंदवुन द्यावे. त्यावंर आमचेवतीने सहया कराव्यात, दस्तऐवजातील मजकुर मान्य व कबुल करावा त्याप्रमाणे दस्तऐवज व खरेदीखत लिहुन द्यावे तसेच त्या दस्तऐवजावरुन आवश्यक असल्यास चुक दुरुस्ती लेख लिहुन दयावे त्यावर आमचे वतीने सहया कराव्यांत ते लिहुन दिल्याचे मान्य करावे.इ. अनुषंगीक कामे करावयाची आहेत.

13. सदरची मिळकत विकसीत केल्यानंतर निर्माण होणारे बांधीव भाग अथवा तत्सम बांधकाम याबाबत ॲलॉटमेंटपत्र देणे, त्यावर सही करणे व ॲलॉटमेंट पत्रानुसार सभासदांना आमचे तर्फे आमचे विकसन कर्ता म्हणुन ताबा देणे त्याकरीता स्वतंत्र कब्जापावती करुन देणे त्यावर सहया करणे मिळकतीची संपुर्ण किमंत स्विकारणे इ.कामे करावयाची आहेत.

14. सदर विकसीत मिळकतीचे खरेदीदारांचे नांवे रेकार्ड ऑफ राईटसला लागणेसाठी अर्ज करावे, त्यासाठी जाबजबाब देणे, नोटीसांवर सहया करणे इ. करावयाची आहेत.

15. सदर मिळकतीबाबत अगर तयार होणारे बांधीव भागाबाबत काही वाद निर्माण झाल्यांस अगर मे. कोर्टात वाद निर्माण करावा लागल्यांस तो निर्माण करावा अगर उपस्थितीत झाल्यांस त्याबाबत सर्व नोटीसा,रिट्स,समन्स तुम्ही आमचेकरीता आमचेवतीने

नसल - १
दस्त क्र.{15} २३६० /२०१६
७८ ३०

स्विकाराव्यांत त्या वादात योग्य ती सर्व कामे करावीत, वाटाघाटी कराव्यांत, दाव्याबाबत समजुत करावी व सदर मिळकती विकसीत करण्यासाठी सर्व ती कामे करावयाची आहेत.

16. सदर मिळकतीवर बांधकाम संबधाने आमचे तर्फे अगर आमचेवतीने अगर आमचे विरुध्द जी जी कार्यवाही होईल, वा केली जाईल, त्या सर्व कार्यवाहीस तुम्ही आमचेवतीने आमचे विकसन कर्ता म्हणुन हजर रहावे, त्याबाबत दावे, कैफियत, जाबजबाब,प्रतिज्ञापत्र दाखल करणे, कागदपत्र दाखल करणे, प्लीडींग करणे, व्हेरिफाय करणे इ.कामे करावयाची आहेत.

17. सदरचे मिळकतीमध्ये बांधुन तयार झालेल्या इमारतीचे अपार्टमेंट अथवा सोसायटीज ॲक्ट नुसार अपार्टमेंट अथवा सोसायटीची स्थापना करणे, सभासदांना सभासदत्व देणे, डिड ऑफ अपार्टमेंट तसेच डिक्लेरेशन नोंदविणे मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला सोसायटी व सभासदाचे नाव लावणे, त्याचप्रमाणे सदरचे विकसन करारनामान्वये व मुखत्यारान्वये मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला इतर अधिकारात सदरचे विकसन करारनाम्याची नोंद करणे. त्याकामी नोटीस फॉर्मवर सहया करणे, इ.कामे करणे.

तसेच सदरहू मिळकतीवर तुम्ही बांधकाम करणार असलेल्या इमारतीस ''विजय पॅराडाईज पार्क'' असे नाव दयावयाचे आहे.

18. वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकती संदर्भाने प्रकल्प पुर्ण होणेपुर्वी भविष्यात नाशिक महानगर पालिका नाशिक यांचेकडील नियमानुसार उपलब्ध एफएसआय व्यतीरीक्त कोणताही वाढीव एफएसआय मिळाल्यास सदरहू वाढीव एफएसआयवर तुमचा 60% व आमचा 40% हक्क राहणार आहे.मात्र मिळकतीसंदर्भाने अपार्टमेंटची स्थापना झालेनंतर एफएसआय मध्ये वाढ झाल्यास वाढिव एफएसआय हा अपार्टमेंटचे मालकीचा राहील.

19. उपरोक्त मिळकत विकसीत झालेनंतर निर्माण होणाऱ्या इमारतीतील सदनिका खरेदीदारांना विक्री करतेवेळी निष्पादीत कराव्या लागणाऱ्या सर्व अनुषंगीक दस्तऐवज जसे करारनामा, खरेदीखत, कब्जा पावती इ. हे तुम्ही आमचे विकसनकर्ता व मुखत्यार

म्हणुन निष्पादीत व नोंदणी करावयचे आहेत.त्यास आमची तसेच भागीदारी फर्मची कोणतीही हरकत राहणार नाही.

20. उपरोक्त मिळकत ही संपुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची असून त्यावर कोणत्याही प्रकारे गहाण, दान,लिन,लिज, अन्नवस्त्र, बक्षीसपत्र, मृत्युपत्र,जप्ती, जामिनकी,कोर्ट वाद, हददीचा वाद,कब्जा बाबतचा वाद, क्षेत्राबाबतचा वाद अगर अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा नाही. तसेच मिळकत कोणासही तोंडी अगर लेखी कराराने विक्री करण्याचा करार मदार केलेला नाही.मिळकत वा मिळकतीचा भाग कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेकडून अॅक्वायर, रिक्वायर,रिझर्व्ह करण्यात आलेली नाही अगर तशी नोटीसही आजलागायत आम्हांस आलेली नाही. तसेच मिळकत वा मिळकतीचा भाग कोणत्याही वित्तीय संस्थेस तारण गहाण देऊन त्यावर कर्जाचा अगर तारणाचा बोजा निर्माण केलेला नाही. मिळकतीत कुळ नव्हता तसेच मिळकतीस कुळ कायदयाच्या तरतुदी लागू नाही.तसेच मिळकती संबधात नजराणा भरण्याची गरज नाही.मिळकत आदिवासीची नव्हती व नाही, मिळकत अगर त्याचे भागातुन रस्ता रुंदीकरणाची रेषा जात नाही व त्यामुळे मिळकतीचे क्षेत्र बाधीत होत नाही.अगर मिळकती हया अगर त्याचा कोणताही भाग नाशिक महानगर पालिका नाशिक यांनी निर्धारीत केलेल्या पुर रेषमध्ये समाविष्ट नाही मिळकतीसंदर्भाने बांधकाम करणेकरीता शासनाने अगर कोणत्याही स्वायत्त संस्थेने कोणत्याही स्वरुपाच्या शार्ती अगर बंधने दिलेली नाहीत.हे तुम्हास खात्रीने सांगुन भरवश्याने लिहुन देत आहोत.वर नमुद बाबीचे उलट काहीही आढळल्यास त्याचे खर्चासह निवारण करुन देण्याची जबाबदारी आमची आहे व राहील.

तसेच प्रस्तुतचा विकसन करारनामा नोंदविल्यानंतर आम्ही सदरच्या मिळकतीवर कोणताही नविन बोजा निर्माण करणार नाही. तसेच आजपावेतोचे सदर मिळकती संदर्भात असलेले सर्व करांचा भरणा हा आम्ही केलेला असून यापुढे सदरचे करांचा भरणा हा तुम्ही करावयाचा आहे.

तसेच लिहुन देणार हे खात्रीने सांगुन भरवश्याने लिहुन देतात की लिहुन देणार अगर त्यांचेवतीने अगर त्यांचेतर्फे हक्क सांगणारे इसम अगर लिहुन देणार यांचे अनुंषगांने इतर कोणीही,सदरहु मिळकत विकसीत करण्यास बाधा पोहचेल असे कोणतेही प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष कृत्य करणार नाहीत या उपरही लिहुन देणार यांचे पक्षी असे कोणतेही वर्तन घडल्याचे आढळल्यास त्याचे खर्चासह व नुकसान भरपाईसह

निवारण करुन देण्याची जबाबदारी लिहुन देणार व त्यांचे पश्चात त्यांचे वारसांची राहील.

21. लिहून घेणार हे खात्री व भरवशाने लिहून देतात की, प्रस्तुतचे दस्तातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता लिहून घेणार हे मुदतीत करतील. तसेच मिळकत विकसीत करणेकामी कोणताही अपघात, नुकसान झाल्यास, लिहून घेणार यांनी त्रयस्थ इसमांस लिहुन दिलेल्या दस्तऐवजामुळे कोणताही वाद अगर तक्रार उपस्थित झाल्यास अगर कोणतीही दिवाणी अगर फौजदारी कारवाई झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी लिहून घेणार यांची राहील.

5] सदरील विकसन करारनाम्याच्या संपुर्ण खर्च म्हणजे स्टॅंप,नोंदणी फि, वकील फी, झेरॉक्स, टायपिंग व इ.अनुषंगीक खर्च लिहुन घेणार यांनीच केलेला आहे व करावयाचा आहे.

6] कलम 1 मध्ये वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही संपुर्ण विकसीत झाल्यानंतर निर्माण होणाऱ्या एकुण बांधकामापैकी आम्हास मोबदल्यापोटी दयावयाचे क्षेत्र (प्रस्तुतचे दस्तात कलम 3 मध्ये वर्णन केलेले क्षेत्र) वगळून उर्वरित सर्व बांधीव क्षेत्र तुम्ही तुमचे मर्जीप्रमाणे विक्री करावयाचे आहे अथवा त्याची विल्हेवाट लावावयाची आहे. त्यास कोणतीही मुदत ठरलेली नाही. त्या विक्री केलेल्या क्षेत्राचा मोबदला अथवा खरेदीदाराकडून मिळणाऱ्या किंमतीवर संपुर्णपणे तुमचा हक्क राहील. त्याचेवर आम्ही अथवा आमचे वालीवारस हक्क सांगणार नाहीत. तसेच सदर मिळकत विकसीत झालेनंतर तुम्हांस सदर विकसनामध्ये जो काही नफा अथवा तोटा होईल. त्यास सर्वस्वी तुम्हीच जबाबदार राहाल. तसेच तुम्ही विक्री केलेल्या क्षेत्रासंदर्भाने होणा-या नफ्या-तोटयावर भरावा लागणारा आयकर अगर इतर कोणताही कर देखील तुम्हीच भरावयाचा आहे.

7] तसेच तुम्ही आम्हाला मोबदल्यापोटी दयावयाचे बांधीव क्षेत्रावर आमचाच संपुर्ण मालकीहक्क राहणार आहे. मात्र सदरहू बांधीव क्षेत्र हे आम्हाला विक्री करावयाचे असल्यास त्यास तुमची कोणतीही हरकत राहणार नाही. तुम्ही सदरचे क्षेत्र विक्री करणेकामी आमचे सांगणेनुसार आमचे संमतीने सदरहू क्षेत्र विक्री करणेकामी दस्त लिहुन दयावयाचे आहे. मात्र सदर आमचे मोबदल्याचे बांधीव क्षेत्र विक्री केलेनंतर येणा-

नसक- 
दस्त क्र.( ६३६३/२०२० )
{18}
२० २०

या किंमतीवर आमचाच हक्क राहील. त्यावर तुम्ही कोणताही हक्क सांगावयाचा नाही. सदरहू आम्हाला मोबदल्यापोटी मिळणा-या क्षेत्राचा आम्ही आमचे मर्जीने उपभोग घ्यावयाचा आहे. व आमचे पश्चात आमचे वारसदारांनी उपभोग घ्यावयाचा आहे अगर विल्हेवाट करावयाची आहे. त्याचेशी तुमचा कोणताही संबंध नाही. तसेच तुम्ही आम्हांस मोबदल्यापोटी दिलेले बांधीव क्षेत्र हे आम्ही विक्री केल्यास त्याचेवर होणारा आयकर व इतर कर तसेच त्या संदर्भाने होणारा नफा -तोटा यास आम्ही जबाबदार राहू. त्याचेशी तुमचा कोणताही संबंध राहणार नाही. तसेच आम्ही लिहून देणार यांना मोबदल्यापोटी तुम्ही दयावयाचे फ्लॅट आम्हांस विक्री करावयाचे असल्यास त्यास तुम्ही लिहून घेणार/ विकसन कर्ता यांनी अडचणी करावयाच्या नाहीत.

8] कलम 1 मध्ये वर्णन केलेली मिळकत हि संपुर्ण विकसीत झाल्यानंतर तुम्हांस जो काही नफा अथवा तोटा होईल तो संपुर्ण तुमचाच राहील.सदरचे नफ्या तोटयास तुम्हीच जबाबदार राहाल.

परिशिष्ठ 1

तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगर पालिका हददीतील मौजे मखमलाबाद या गावचे शिवारातील बिनशेती प्लॉट मिळकत यासी सर्व्हे नं.418/22 यातील प्लॉट नं.22 यासी क्षेत्र 448.00 चौ.मी. यासी चतुःसिमा पुढील प्रमाणे.

पुर्वेस : रोड.
पश्चिमेस : प्लॉट नं.23.
दक्षिणेस : प्लॉट नं.21.
उत्तरेस : रोड.

येणे प्रमाणे चतुःसिमेतील वर नमूद प्लॉटेड क्षेत्राची मिळकत तदंगभुत वस्तूसह जल,काष्ट, पाषाण, निधी, निक्षेपासह जाणे-येणेचे हवा, उजेड, पाणी, रस्ता वापरण्याच्या हक्कांसह मिळकतीवरील एफएसआय व टिडीआर वापरण्याचे हक्कासह आम्हास मालक या नात्याने प्राप्त असलेल्या संपुर्ण हक्कांसह दरोबस्त प्लॉट मिळकत.

परिशिष्ठ 2

अ. आम्हास(लिहुन देणार यांना) दयावयाच्या बांधीव जागेचे वर्णनः-

दस्त क्र.( ६३६० /२०१५)
३०

सदरहू परिशिष्ट-1 यात वर्णन केलेल्या मिळकतींचे एकत्रीकरण करुन तुम्ही तुमचे पदरखर्चाने बांधकाम करावयाचे असुन इमारतीमधील खालील वर्णनाच्या सदनिका मिळकती तुम्ही आमचेपैकी नं.1 ते 3 यांना विकसनाचा मोबदला म्हणून संपुर्ण मालकीहक्काने दयावयाचा आहे.

| अ.नं. | मजला | सदनिका क्रमाक चौ.मी. | क्षेत्र बिल्टप | धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ए. | पहिला | 01 | 54.18 | श्री.जगदिश पोपट बोडके |
| बी. | पहिला | 02 | 79.08 | श्री.जगदिश पोपट बोडके |
| सी. | दुसरा | 05 | 54.18 | श्रीमती सत्यभामा पोपट बोडके |
| डी. | दुसरा | 08 | 77.78 | श्री.संतोष पोपट बोडके |
| इ. | तिसरा | 09 | 54.18 | श्री.संतोष पोपट बोडके |
| एफ. | चौथा | 13 | 54.18 | श्रीमती सत्यभामा पोपट बोडके |
| | एकुण | 06 सदनिका यासी एकुण क्षेत्र 373.58 चौ.मी. | | |

## परिशीष्ठ 3

आम्हास परिशीष्ठ 2 यात नमुद केल्या प्रमाणे मिळणा-या बांधीव जागे मध्ये असना-या सुविधांचे तसेच संपुर्ण इमारतीचे स्पेसिफीकेशन

1. संपुर्ण आर.सी.सी.स्ट्रक्चर.
2. बाहेरील भिंती 6 इंच विटांमध्ये व आतील भिंती 4 इंच विटामध्ये.
3. भिंतींना आतील बाजूस नेरु प्लास्टर व बाहेरील बाजुस सँड फिनिश्ड प्लास्टर, ट्रॅक्टर इमलशन पेंट कलरमध्ये, तसेच खिडक्यांना ऑईल पेंट.
4. टाईल्सः सर्व रुम्समध्ये 2× 2 मापाच्या व्हेट्रीफाईड टाईल्स व स्कर्टींग बसवण्यात येतील.
5. सर्व फ्लॅटसला 3 इंचापर्यंत व्हेट्रीफाईड स्कर्टींग.
6. सर्व रुम्समध्ये थ्री ट्रॅक ॲल्युमिनियम स्लायडींग विंडोज, मॉस्कीटो नेट व एम.एस.सेफ्टी ग्रीलसह बसवण्यात येईल. तसेच चारही बाजुने ग्रेनाईट फ्रेम बसवण्यात येईल.

7. बाथरुममध्ये फुल कलर डिजीटल व तळाला स्पार्टेक टाईल्स बसवण्यात येतील. संडासमध्ये फुल डिजीटल टाईल्स बसवण्यात येतील.

8. ब्लॅक ग्रेनाईट टॉप एस.एस.सिंकसह.

9. मुख्य दरवाजा मलेशियन वुडमध्ये असेल आणिक बाकी सर्व दरवाज्यांच्या फ्रेम मार्बलमध्ये राहतील.

10. 10,000 Ltr. लिटर क्षमतेची एक ओव्हरहेड व एक अंडरग्राऊंड टाकी सर्व फ्लॅट धारकांना सामायीक वापरासाठी करण्यात येईल.

तसेच प्रत्येक फ्लॅटमध्ये बाथरुम, किचन, व संडासमध्ये योग्य रचनेप्रमाणे नळ व वॉश बेसीन देण्यात येईल.

11. बाथरुम व संडासमध्ये उच्च प्रतिचे सॅनेटरी वर्क प्लंबींग कन्सील्ड फिटींग करण्यात येईल. तसेच किचन, बाथरुम, संडास व वॉश बेसीनला प्रत्येकी एक नळ बसवण्यात येईल.

12. प्रत्येक खोलीत एक दिवा पॉईंट, एक पंखा पॉईंट, लिव्हींग रुममध्ये टि.व्ही.चा एक पॉईंट, एक प्लग पॉईंटची सोय व बाथरुममध्ये गिझर पॉईंट, परंतू गिझर देण्यात येणार नाही व संपुर्ण वायरिंग फिटींग कन्सील्ड, परंतू गिझर देण्यात येणार नाही व संपुर्ण वायरिंग फिटींग कन्सील्ड करण्यात येईल.

13. तळ मजल्यावर ॲलॉटेड पार्कींग.

14. कॉमन टेरेस सर्व सभासदांकरीता.

15. लिफ्ट बॅटरी बॅकअपसह.

येणेप्रमाणे सदरील सुविधा देण्यात येतील.

येणेप्रमाणे परिशीष्ठ 1 ते 3 असे.

येणे प्रमाणे सदरचा विकसन करारनामा आम्ही उभयतांनी राजीखुषीने व स्वसंतोषाने लिहुन देवुन वाचुन घेऊन समजुन उमजुन लिहुन देऊन सदरचा दस्त कबुल असलेबाबत मान्य करुन या दस्तावर आम्ही सहया केल्या असे.





जय डेव्हलपर्स
भागीदारी संस्था तर्फे भागीदार
श्री.विजय वासुदेव लालवाणी

लिहुन घेणार

दस्त क्र. ( 6382/2016)
24 / 30



1. श्रीमती सत्यभामा पोपट बोडके — सपाबोडके



2. श्री.जगदिश पोपट बोडके — Bodke



3. श्री.संतोष पोपट बोडके — S. P. Bodke



4. करुणा पोपट बोडके
लग्नानंतरचे नाव
सौ.करुणा चंद्रकांत बर्के — K. P. Bodke

लिहून देणार

:: साक्षिदार ::

1] ____________
कपिल लक्ष्मण मानकर

2] गणेश ____________
गणेश काशीराव भोसले

SEAL OF THE JOINT-SUB-REGISTRAR ★ VASHI ★

26

363

गाव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक)

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

म. गा. २४
L. V. 24 ग

# गाव : मखमलाबाद, ता. नाशिक, जि. नाशिक.

| भूमापन क्र. सर्व्हे नंबर | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पध्दती | भोगवटादाराचे नाव | खाते क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ४१८ | 22 | | (७७२१) (७८०८) (९५२५१) (९५६७५) सत्यभामा पोपट बोडके / जगदिश पोपट बोडके / संतोष पोपट बोडके (८९९६९) / 1) मंदाबाई अशोक बोडके / 2) सौरभ उर्फ आनंद अशोक बोडके / 3) स्वाती बापू अशोक बोडके उर्फ स्वाती किरण आव्हाड. / 1) सुरेश अशोक बोडके (30939) / (३२०५८) | |

| शेताचे स्थानिक नाव | प्लॉट नंबर | इतर अधिकार |
|---|---|---|
| | 22 | बिनशेती |

| लागवडीयोग्य क्षेत्र | चौ. | मि. |
|---|---|---|
| ......... | ४४८ | ०० |
| ......... | | |
| ......... | | |
| एकूण .. | ४४८ | ०० |
| पोटखराब (लागवडीयोग्य नसलेले)- | | |
| वर्ग (अ) .. | | |
| वर्ग (ब) .. | | |
| एकूण .. | | |
| | रूपये | पैसे |
| आकारणी .. | ० | ९ |
| बिनशेती साकार .. | ९५७ | ७० |
| एकूण .. | | |

दस्त क्र. (६३६२/२०१५) २६/३०

गा. नं. क्र. ७ अ

## गाव नमुना बारा (पिकांची नोंदवही)

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम २९]

| वर्ष | जमीन करणाराचे नाव | रीत | हंगाम | पिकाखालील क्षेत्रांचा तपशील: मिश्र पिकाखालील क्षेत्र: मिश्रणाचा संकेत क्रमांक | जल सिंचित | अजल सिंचित | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र: पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र: पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन: स्वरूप | क्षेत्र | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| २०१४ २०१५ | खुद | - | ख | | हे. आ. | हे. आ. | | हे. आ. | हे. आ. | | हे. आ. | हे. आ. | चौ. मी. प्लॉट | कडे | | |

नक्कल फी

नक्कल प्रमाणे खरी नक्कल तयार ता. 27 MAY 2015

तलाठी मखमलाबाद
ता. जि. नाशिक

आयकर विभाग — भारत सरकार

INCOME TAX DEPARTMENT — GOVT. OF INDIA

VIJAY VASUDEV LALWANI

VASUDEV RAMCHAND LALWANI

11/11/1984

Permanent Account Number

ABWPL8642C

Signature

सोमवार,13 जुलै 2015 5:01 म.नं.

दस्त गोषवारा भाग-1

नसन1 28 / 30

दस्त क्रमांक: 6362/2015

दस्त क्रमांक: नसन1 /6362/2015

बाजार मुल्य: रु. 1,04,92,000/- मोबदला: रु. 85,21,000/-

भरलेले मुद्रांक शुल्क: रु.5,24,600/-

द. नि. सह. दु. नि. नसन1 यांचे कार्यालयात

अ. क्रं. 6362 वर दि.13-07-2015

रोजी 4:57 म.नं. वा. हजर केला.

पावती:14199 पावती दिनांक: 13/07/2015

सादरकरणाराचे नाव: जय डेव्हलपर्स तर्फे भागीदार विजय वासुदेव लालवाणी

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 600.00 |
| पृष्टांची संख्या: 30 | |
| एकुण: | 30600.00 |

V. Lalwani

दस्त हजर करणाऱ्याची सही:

सह दुय्यम निबंधक वर्ग-२ नाशिक-१

Sub Registrar Nashik 1

सह दुय्यम निबंधक वर्ग-२ नाशिक-१

दस्ताचा प्रकार: विकसनकरारनामा

मुद्रांक शुल्क: (एक) कोणत्याही महानगरपालिकेच्या हद्दीत किंवा स्थालगत असलेल्या कोणत्याही कटक क्षेत्राच्या हद्दीत किंवा उप-खंड (दोन) मध्ये नमूद न केलेल्या कोणत्याही नागरी क्षेत्रात

शिक्का क्रं. 1 13 / 07 / 2015 04 : 50 : 52 PM ची वेळ: (सादरीकरण)

शिक्का क्रं. 2 13 / 07 / 2015 04 : 52 : 16 PM ची वेळ: (फी)

SEAL OF THE JOINT-SUB-REGISTRAR Class-2 NASIK-I
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

13/07/2015 5 04:22 PM

दस्त गोषवारा भाग-2

नसन1 28 | 20
दस्त क्रमांक:6362/2015

दस्त क्रमांक :नसन1/6362/2015
दस्ताचा प्रकार :-विकसनकरारनामा

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | पक्षकाराचा प्रकार | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| 1 | नाव:जय डेव्हलपर्स तर्फे भागीदार विजय वासुदेव लालवाणी<br>पत्ता:प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: कॅनडा कॉर्नर नाशिक , महाराष्ट्र, णाम्:ईक्.<br>पॅन नंबर:AAGFJ4258F | लिहून घेणार<br>वय :-29<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 2 | नाव:1.सत्यभामा पोपट बोडके<br>पत्ता:प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: मखमलाबाद नाशिक , महाराष्ट्र, णास्:ईक्.<br>पॅन नंबर:BGYPB9492C<br>स.प.बोडके | लिहून देणार<br>वय :-46<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 3 | नाव:2.जगदीश पोपट बोडके<br>पत्ता:प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: मखमलाबाद नाशिक , महाराष्ट्र, णास्:ईक्.<br>पॅन नंबर:BMLPB1601C | लिहून देणार<br>वय :-26<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 4 | नाव:3.संतोष पोपट बोडके<br>पत्ता:प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: मखमलाबाद नाशिक , महाराष्ट्र, णास्:ईक्.<br>पॅन नंबर:BQRPB4464R<br>S.P. Bodke. | लिहून देणार<br>वय :-22<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 5 | नाव:4.करुणा पोपट बोडके लग्नानंतरचे नाव करुणा चंद्रकांत वर्के<br>पत्ता:प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: शिंगवे ता.निफाड जि.नाशिक , महाराष्ट्र, णास्:ईक्.<br>पॅन नंबर:<br>K.P. Bodke | लिहून देणार<br>वय :-26<br>स्वाक्षरी:- |  |  |

वरील दस्तऐवज करुन देणार तथाकथीत विकसनकरारनामा चा दस्त ऐवज करुन दिल्याचे कबुल करतात.
शिक्का क्र.3 ची वेळ:13 / 07 / 2015 04 : 55 : 03 PM

ओळख:-
सदर इसम दुय्यम निबंधक यांच्या ओळखीचे असून दस्तऐवज करुन देणा-यांना व्यक्तीशः ओळखतात, व त्यांची ओळख पटवितात

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| 1 | नाव:अॅड. अनिल सुभाष महाले - -<br>वय:34<br>पत्ता:शरणपूर रोड नाशिक<br>पिन कोड:422002 | स्वाक्षरी |  |  |

Summary-2( दस्त गोषवारा भाग - २ )

नासिक - १
दस्त क्र.( ६३६२/२०१५)
३० / ३०

शिक्का क्र.4 ची वेळ:13 / 07 / 2015 04 : 55 : 45 PM

शिक्का क्र.5 ची वेळ:13 / 07 / 2015 04 : 55 : 54 PM नोंदणी पुस्तक 1 मध्ये

सह दुय्यम निबंधक वर्ग-२
Sub Registrar Nashik1
नाशिक-१

EPayment Details.

| sr. | Epayment Number | Defacement Number |
|---|---|---|
| 1 | MH002241708201516R | 0001414252201516 |

6362 /2015

Know Your Rights as Registrants

1. Verify Scanned Document for correctness through thumbnail (4 pages on a side) printout after scanning.
2. Get print and mini-CD of scanned document along with original document, immediately after registration.

For feedback, please write to us at feedback.isarita@gmail.com

प्रमाणित करण्यात येते की
या दस्तामध्ये एकुण १ ते. ३० पाने आहेत

सह दुय्यम निबंधक वर्ग २
नाशिक-१

पुस्तक क्रमांक १
अनुक्रमांक ६३६२ वर दिनांक
१३ जुलै २०१५ रोजी नोंदला.

सह.दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१

SEAL OF THE JOINT-SUB-REGISTRAR Class-2 ★ NASIK-I ★
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-१